**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्र. रानिआ/मनपा२०१४/प्र.क्र.२ /का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक : - २७/०१/२०१४.

प्रति,

महापालिका सचिव,
उल्हासनगर महानगरपालिका
सचिव कार्यालय, पहिला मजला,
उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय,
उल्हासनगर-४२१००३.
जि.ठाणे.

विषय :- श्री.सुरेश (पप्पू) बुधरोमल कलानी, महापालिका सदस्य यांच्या अनर्हतेबाबत..

संदर्भ :- आपले पत्र क्र.उमपा/स.का/१८७/२०१३, दि.१३/१२/२०१३.

महोदय,

श्री.सुरेश (पप्पू) बुधरोमल कलानी, सदस्य उल्हासनगर महानगरपालिका यांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश, कल्याण यांनी इंडियन पिनल कोडच्या कलम ३०२ सह कलम १२० बी खाली दोषी ठरविले असून त्याबद्दल त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे असे आपल्या संदर्भांकित पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १० मधील तरतुदी अन्वये अनर्ह ठरविण्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी राज्य निवडणूक आयोगास विनंती करण्यात आली आहे.

या संदर्भात नमूद करण्यात येते की, नैतिक अध:पतनाच्या अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने पालिका सदस्यास सिध्दापराध ठरविलेले असेल तर असा सदस्य पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरतो. या संदर्भातील संबंधित तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०, ११ व १२ मध्ये तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १६, १७ व १८ मध्ये आहेत.

अधिनियमातील उपरोक्त तरतुदी लक्षात घेता एखाद्या पालिका सदस्यास नैतिक अध:पतनाच्या अपराधाबद्दल सक्षम न्यायालयाने सिध्दपराध ठरविले असल्यास असा सदस्य अनर्ह ठरला असल्याबाबतचे

औपचारीक आदेश संबंधित महापालिका आयुक्त यांनी काढणे आवश्यक आहे. मात्र असे आदेश काढण्यापूर्वी अधिनियमातील संबंधित तरतुदी मध्ये नमूद करण्यात आलेला कालावधी उलटून गेलेला नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच पालिका सदस्यास दोषी ठरविण्यासंदर्भातील सक्षम न्यायालयाचा आदेश वरिष्ठ न्यायालयाने फिरविलेला नाही अथवा अन्य काही आदेश दिलेला नाही याचीही खात्री करून घेणे आवश्यक आहे.

तरी वरील बाबी लक्षात घेऊन श्री.सुरेश (पप्पू) बुधरोमल कलानी, सदस्य उल्हासनगर महानगरपालिका हे पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरले असल्याबाबतचे आदेश काढण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

धमाकानेड

(ध.मा.कानेड)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रत
सर्व महानगरपालिका आयुक्त यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.